# जिल्हा व सत्र न्यायालय, बीड.
# नोटीस
## दिनांक ०४/०४/२०२०

**मा. उच्च न्यायालयाच्या ई-कमेटी यांच्या निर्देशानुसार सदय परिस्थितीमध्ये कोविड.१९ कोरोना विषाणुच्या संसर्गाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेमुळे विधिज्ञ व पक्षकारांना न्यायालयामध्ये उपस्थित न राहण्याबाबत सुचित केलेले आहे.**

तथापी, न्यायाधीश, विधिज्ञ, पक्षकार यांना फक्त अतिमहत्वाच्या प्रकरणांच्या कामाकरिता सोईचे व्हावे यासाठी जिल्हा न्यायालय तसेच तालुका (दि.न्या.क.स्तर शिरुर/आष्टी/पाटोदा/धारुर/वडवणी या व्यतिरिक्त) न्यायालयामार्फत व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधा उपलब्ध केलेली आहे.

अतिमहत्वाच्या प्रकरणामधील कामकाजासाठी नमुद व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधा कक्ष क्रमांक ३१६ मध्ये उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. सदर सुविधा कार्यालयीन वेळेत सकाळी ११ ते दुपारी २.०० वाजेपर्यंतच सुरु राहिल. अशी प्रकरणे/रिमांड कार्यालयीन आदेशाने निर्देशित केलेली न्यायीक अधिकारी त्यांना उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या निजी कक्षातील व्हिडीओ कॉन्फरन्सिंग युनिटव्दारे सुनावणी घेतील. हि सुविधा जिल्हा न्यायालय बीड तसेच तालुका (दि.न्या.क.स्तर शिरुर/आष्टी/पाटोदा/धारुर/वडवणी या व्यतिरिक्त) न्यायालयांमध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधा उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

## संपर्काकरिता न्यायालयनिहाय ई-मेल आय.डी.

| अ. क्र. | न्यायालयाचे नांव | ई.मेल आय.डी |
|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायालय, बीड | **mahbeedc@mhstate.nic.in** |
| २ | जिल्हा न्यायालय, अंबाजोगाई | **mahbeedambsc@aij.gov.in** |
| ३ | जिल्हा न्यायालय, माजलगांव | **mahbeedmajsc@aij.gov.in** |
| ४ | दिवाणी न्यायालय क.स्तर. परळी | **mahbeedparsc@aij.gov.in** |
| ५ | दिवाणी न्यायालय क.स्तर. केज | **mahbeedkaisc@aij.gov.in** |
| ६ | दिवाणी न्यायालय क.स्तर. गेवराई | **mahbeedgeosc@aij.gov.in** |

अतिमहत्वाची प्रकरणे संबंधित कर्मचा-याचे समक्ष व्हिडीओ कॉन्फरन्सिंग कक्षामध्ये घेतले जातील. कार्यालयीन आदेशाने निर्देशित केलेले न्यायीक अधिकारी त्यांना उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या निजी कक्षातील व्हीडीओ कॉन्फरन्सिंग युनिटव्दारे सुनावणी घेण्यांत येईल.

याव्दारे पोलीस कर्मचा-यांना असे निर्देशीत करण्यांत येते की, जे कोणी पोलीस कर्मचारी आरोपींची रिमांड मागतील त्यांनी संबंधित आरोपीस व्हिडीओ कॉन्फरन्सिंग कक्षामध्ये हजर करावयाचे आहे. मुळ रिमांड रिपोर्टवर संबंधित आरोपीची सही व्हिडीओ कॉन्फरन्सिंग दरम्यान संबंधीत न्यायिक अधिका-याचे समक्ष घ्यावयाची आहे. ज्या प्रकरणांत न्यायीक अधिकारी न्यायालयीन कोठडीचा आदेश पारीत करतील, तो आदेश पोलीस कर्मचा-याने संबंधीत अधीक्षक, जिल्हा कारागृह अथवा संबंधीत जेलर यांना कळवावा.

**सदरील सुविधा हि फक्त लॉकडाउन कालावधीकरीता उपलब्ध राहिल.**

स्वाक्षरीत/-

**दिनांक :- ०४/०४/२०१९**

**(एच.एस.महाजन)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,**
**बीड.**

**सोबत :-** व्हीडीओ कॉन्फरसिंग सुविधा वापराबाबतची माहिती.

# <u>व्हीडीओ कॉन्फरसिंग सुविधा वापराबाबतची माहिती</u>

१. अतिमहत्वाच्या प्रकरणांत संबंधित वकील/पक्षकार यांनी ई-मेलव्दारे व्ही. सीव्दारे घेणेबाबत विनंती अर्ज एक दिवस अधी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० यावेळेत उपरोक्त नमुद ईमेल वर कळविणे आवश्यक आहे, त्यानंतर येणा-या अर्जांचा विचार पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी विचारात घेण्यात येईल.

२. विनंती अर्जासोबत प्रकरणाचे स्कॅन/पीडीएफ प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच अर्जावर वकीलांचे बार कॉन्सील एन्रॉलमेंट क्रमांक नमुद करावे व फोटो आयडी ची स्कॅन कॉपी जोडणे आवश्यक आहे.

३ संबंधित अधिक्षक/सहा.अधिक्षक यांनी प्रकरणे संबंधित न्यायीक अधिका-यांचे निर्देशावरुन प्रकरणांचे महत्व ठरवुन व्हीडीओ कॉन्फरसिंग साठीची वेळ व दिनांक संबंधित वकील/पक्षकार यांना ई-मेल कळविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे संबंधित प्रकरणावर वस्तुता: नोंदविणे आवश्यक आहे.

४. न्यायालयाने घेतलेला आदेश उद्घोषित करण्यांत येईल व त्याची प्रत उपलब्ध करुन देण्यांत येईल.

५. वरील कार्यपदधती राबवत असतांना कोविड-१९ बाबतचे केंद्र व राज्य सरकार यांचे मार्फत पारीत केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करण्यांत यावे.